# गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातातील स्त्रियांचा आहार व आरोग्य एक चिकीत्सक अध्ययन (कोरची तालूक्याशी संबधीत)

**मिनाक्षी दादाजी नागदेवते**
नागपूर (महाराष्ट्र)
संशोधक विद्यार्थिनी
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

भारतात विविध धर्म वंश संस्कृतीचे लोक राहतात. तसेच विविध भाषा आणि बोली बोलणारे लोक राहतात. त्यामुळे भारतीय समाजात विविधता आहे. भारतीय समाज विविध जातीमध्ये विभाजीत झाला आहे. आपल्या देशात सहा हजारापेक्षा जास्त जाती आणि उपजाती आहेत. जातीप्रमाणेच विविध आदिवासी जमाती सुध्दा आहेत. देशातील जवळ पास सर्वच राज्यात आदिवासी लोक राहतात.आदिवासी समाज म्हणजे एका विशिष्ट भुप्रदेशात वास्तव्य करणारा, एकसमान भाषा बोलणारा समान जीवन पध्दती जगणारा तसेच तांत्रिक ज्ञानाच्या दृष्टिने मागासलेला समाज आहे.अदिकाळापासून जंगलाचे राजे म्हणून ओळखले जाणारे आदिवासी जमातीचे जीवनमान आजच्या युगामध्ये जर पाहण्यात आले तर अतिशय निम्न दर्जाचे असून अन्न, वस्त्र, निवरा ह्या अती आवश्यक असणाऱ्या गरजाची पूर्तता देखील त्यांच्याकडून होत नाही. भारतीय आणि पाश्चात्य संशोधकांच्या विचारापासून असे प्राप्त होते की आदिवासी समाज हा इतर समाजापेक्षा वेगळा असून त्याची सामाजिक वैशिष्टये इतर समाजापेक्षा वेगळी आहेत. त्याचप्रमाणे त्यांची आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक पध्दती भिन्न आहे.अश्या या भिन्न परिस्थिती असलेल्या समाजातील स्त्रियांचे जीवनमान सुध्दा इतर समाजातील स्त्रियापेक्षा अगदी भिन्न आढळते. आदिवासी समाजातील स्त्रियांच्या दर्जाबाबत मानवशास्त्रज्ञामध्ये बरेच मतभेद आहेत. आदिवासी समाजात स्त्रियांचा दर्जा हा श्रेष्ठ आहे. पुरूषाइतकाच सन्मान स्त्रियांना दिला जातो.

सभ्य समाजातील स्त्रियांच्या मानाने या समाजातील स्त्री स्वतंत्र आहे. असे मत काही मानसशास्त्रज्ञानी मांडले. तर काही शास्त्रज्ञांनी तिचा दर्जा कनिष्ठ दर्जाचा आहे तिला कोणतेच स्वातंत्र्य नाही तिला पुरूषाच्या मर्जीनुसार वागावे लागते असे मत मांडले आहेत. भारतामध्ये अनेक आदिवासी आहेत या आदिवासी जमातीमध्ये काही आदिवासी जमाती मातृसत्ताक कुटुंब आहेत. तर काही आदिवासी जमाती पितृकसत्ताक कुटुंब आहेत. मातृसत्ताक कुटुंब पध्दतीमध्ये कुटुंब प्रमुख ही स्त्री म्हणजे माता आहे. स्त्रियांच्या नावाचे वंश परंपरा निर्धारित होते मातृसत्ता कुटुंब पध्दतीमध्ये मुल–मुली आपल्या नावासमोर आईचे नाव लिहितात. मातृसत्ताक कुटुंब पध्तीमध्ये सत्ता संपत्ती अधिकार निर्णय क्षमाता स्त्रियांच्या हातात एकवटलेली असते. (खासी, गारो आणि नायर) या मातृसत्ताक कुटुंब पध्दती आहेत. तर पितृकसत्ताक कुटुंब पध्दतीमध्ये पुरूष हा कुटुंब प्रमुख असतो सत्ता, संपत्ती अधिकार, निर्णय इत्यादी बांबी पुरूषांच्या हातात एकवटलेली असते. वंश परंपरा ही पुरूषांच्या नावाने निर्धारित होते.

गडचिरोली जिल्हयातील गोंड (माडिया) या जमातीमध्ये पितृक कुटुंब पध्दती आढळून येते. गोंड या पितृसत्ताक असलेल्या जमातीमध्ये स्त्रिया या पुरूषाच्या बरोबरीने काम करतात परंतु त्यांच्या दर्जा कनिष्ठ आहे. या समाजात अजुनही रूढी परंपराच्या प्रभाव असल्यामुळे पाहिजे तसा या स्त्रियांचा विकास झालेला नाही. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातातील स्त्रियांचा आहार व आरोग्य एक चिकित्सक अध्ययन (कोरची तालुक्यातील संबंधीत) करताना पुढील उद्देश समोर ठेवलेले आहेत.

Keywords: आदिवासी महिला, गोंड जमात, आहार, पोषण, वनौषध

**उद्दिष्टे–**

1) गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातातील आर्थिक विषयी माहीती प्राप्त करून घणे.

2) गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातातील स्त्रियांचे आहारातील विशेष पदार्थ जाणून घेणे.

3) गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातातील स्त्रियांचा आहार व आरोग्य याचा संबंध जाणून घेणे.

4) गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातातील स्त्रियांचे आरोग्य व वनौषधी यांचा संबंध जाणून घेणे.

**संशोधनाची गृहितके–**

''गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातातील स्त्रियांचा आहार व आरोग्य एक चिकित्सक अध्ययन (कोरची तालुक्याशी संबंधीत) या विषयाचे अध्ययन ज्या गृहीतकृत्यांच्या आधारे केले ती पुढील प्रमाणे

1) गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातीच्या आहारात विशेष अन्नपदार्थाचा वापर केल्या जात नाही.

2) आदिवासी गोंड जमातीतील स्त्रियांचे आरोग्य आणि वनौषध यांचा संबंध दिसत नाही.

**संशोधन पध्दती–**

गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातातील स्त्रियांचा आहार व आरोग्य एक चिकित्सक अध्ययन (कोरची तालूक्याशी संबंधीत) करताना प्राथमिक स्त्रोत व द्वितीय स्त्रोताच्या आधारे माहिती संकलीत करण्यात आली. प्राथमिक स्त्रोताच्या माध्यमातून सहभागी निरीक्षणातून आदिवासी स्त्रियांचा आहार व आरोग्य त्यांचे राहणीमान व कोणती वनौषधी उपयोगात आणतात सर्व संबंधीत सामग्री संकलीत करण्यात आली. तसेच द्वितीय स्त्रोताच्या सहाय्याने माहितीचे संकलन करत असताना नियतकालिके मासिक, वृत्तपत्रे, शासकीय अधिनियम विविध वेबसाईट द्वारे अध्ययन करण्यात आले.

**गडचिरोली जिल्हयातील कोरची या तालुक्यातील आदिवासी गोंड जामतीची आर्थिक परिस्थिती**

गडचिरोली जिल्हयातील कोरची तालुका हा जिल्हयाच्या शेवटच्या टोकावर असून छत्तीसगड राज्याच्या सीमेलगत डोंगरावर वसला आहे व घनदाट जंगलाने व्यापलेला आहे. आजही ही जमात वनात व दऱ्याखोऱ्यात राहणारी आहे. नागरी वस्तीपासून दुर अंतरावर राहत असल्यामुळे ही जमात आर्थिक दृ

ष्टया मागासलेली आहे. दळणवळणाच्या सुविधाचा अभाव अपुऱ्या वैधकीय सुविधा तसेच सकस आहार व स्वच्छ पाणी इत्यादीचा तेथे अभाव अपुऱ्या वैद्यकीय सुविधा यांचा अभाव आढळतो. त्याचप्रमाणे गरीबी, बेकारी, अतिमागासलेलापणा, अज्ञान यामुळे त्यांचा जमीनी सावकार, व्यापारी, जमीनदार आदिंनी बळकावून एकापरीने त्यांची लुट केलेली आहे. या लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. यांची शेती पूर्णता वरच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे पाहिजे तसे उत्पन्न शेतातून मिळत नाही. यामुळे त्यांचा आर्थिक दर्जा खालावलेला दिसतो. यामुळे पाहिजे तसा पोषक आहार मिळत नाही.

कोरची तालुका घनदाट जंगलाने व्यापलेला आहे. या लोकांचे संपूर्ण जीवन जंगलाशी निगडीत आहेत त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन हे जंगलातून मिळणाऱ्या वस्तुपासुन होते. परंतु सरकारचे वनधोरण झाले तेव्हापासुन या लोकांचा जंगलावरचा अधिकार संपला आहे. यामुळे उदरनिर्वाहासाठी जंगल संपत्तीचा उपयोग करू शकत नाही. यामुळे यांची आर्थिक परिस्थिती अधिक खालावलेली दिसते.

गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातीतील स्त्रियांचा आहारातील विशेष पदार्थ जाणून घेणे

आदिवासी स्त्री ही निसर्गाच्या कुशीत राहणारी उन, वारा, पाऊस दारिद्रय, दुख यांच्याशी तीची झुंज सुरू असते मुलभूत गरजाच्या पुर्तीसाठी कराव्या लागणाऱ्या धडपडीमुळे ती सुध्दा पुरूषाप्रमाणे सहनशील कष्टाळू काटक आणि हिम्मत बाज बनली आहे. या भागातील स्त्री दळण, कांडण, झाडलोट, शेंणपाणी, स्वयंपाक, निंदणी कापणी, मोळया वाहणे इत्यादी कष्टाची कामे करीत असतात. या लोकांची मालमत्ता म्हणजे कोंबड्या आणि जनावरे, कोंबड्या बहुधा स्त्रियांची मालमत्ता असते.

घरातील प्रत्येक स्त्रीला तिच्या स्वतच्या मालकीच्या कोंबड्या आणि क्वचितप्रसंगी शेळयाही असतात. त्याचप्रमाणे रानातल्या वस्तु जसे करवंदे, आवळे, आंबे, हिरडा, बेहडा विकून पैसे कमवित असतात. या पैशातुन रोजच्या जीवनात उपयोगात येणाऱ्या वस्तु विकत घेत असतात. त्याच्या रोजच्या आहारातील पदार्थ हे वनातलेच असतात. जसे हुलगे, कुरडु, बरकी, रानआळू, काजी, म्हसवेल, कस्ट्रली बार, भोकरे, मोहट्या, वाघोटी इत्यादी रानभाज्याचा उपयोग केल्या जातो. पावसाळ्याचे दिवस या लोकांना तंगीचे दिवस असतात. तेव्हा ते गव्हाचा किंवा ज्वारीचा घाटा किंवा अंबील रानकेळीचे कंद, कडूकांदा इत्यादी रानभाज्या खातात.सण—उत्सावाच्या वेळी पाहुणचाराला दुध—दही पुरणपोळी धावणे इत्यादी प्र'कार त्यांच्या आहारात आढळतात. त्यांचा आहारात तेल आणि मसाल्याचे प्रमाण फारच कमी वापरतात किंवा जवळ—जवळ नसतेच. यांचा खादयपदार्थात मासाहाराचा सुध्दा वापर करतात. जंगलातले पशु—पक्षी यांची शिकार करून आणि नदिनाल्यातले मासे आणि खेकडे पकडून ते आपल्या आहारात उपयोग करतात. अशाप्रकारे यांचा आहारात जास्तीत जास्त निसर्गातल्या खाद्यपदार्थाचाच उपयोग करताना आढळतात.

**गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातीतील स्त्रियांचा आहार व आरोग्य यांचा संबंध जाणून घेणे**

आरोग्य हे अन्नावर निर्भर असते. ज्या प्रकारचा आहार मिळेल त्यावर शरीर सौष्ठव, आरोग्य, पुर्ननिर्मिती, कार्यशक्ति अवलंबून राहते. आयुर्वेदशास्त्रात तसेच गीतेत अन्न आणि आरोग्य यांचा सहसंबंध

जोडलेला आहे. सत्व, रज, तम हे मानवी स्वभावगुण आहारावर निर्भर आहे. मानवाची सर्वगीण प्रगती ही सुदृढ आरोग्याची पावती असते. परंतु आदिवासी समाजाचे अध्ययन करताना असे आढळून आले कि या लोकांना अनेक आहाराविषयक समस्याना तोंड द्यावे लागते. कारण की, कोरची तालुका हा डोंगर भागावर व घनदाट जंगलाने व्यापलेला आहे हे लोक मु'यत डोंगर कपारातील दुर्गम ाागात राहतात. बहुतेकांच्या घरी अठराविश्व दारिद्रय नांदते. त्यांना धड दोन वेळेचे अन्नही पोट भर खायला मिळत नाही. सकस आहार तर दुरच परंतु पिण्याच्या पाण्याच्या सोई अभावामुळे आजही अनेकाना नदी, नाले, झऱ्याचे पाणी प्यावे लागते. शुध्द पेयजलाचा अभाव पाणवट्यावरील अस्वच्छता पावसाळयात गढूळ पाण्यातून फौलवणारे रोग जसे डायरीया, कावीळ, थंडी–ताप इत्यादी. डासापासून पसरणारे मलेरिया, फायलेरिया यांचा प्रादुर्भाव जास्त आढळतो.

आहार पुरेसा किंवा प्रथिने व जीवनसत्वानी युक्त न मिळणे व्यसनाधिनता यातूनही प्रतिकार शक्ती कमी होऊन आजार पसरतात. कमी वयात मुलीचे विवाह, शारीरीक वाढ पुरेशी होण्यापुर्वीच अपत्य प्राप्ती एकदम चार–पाच मुले होणे यातुन मातेची व बालकांची प्रकृती खालावते. जन्मातच कुपोषित व कमी वजन असलेली किंवा मुदतपूर्व जन्मलेली मुले रोगांना बळी पडतात व त्यातून माता मृत्युदर व बालक मृत्युदर वाढते.आदिवासी भागात लैंगिक रोगही आढळतात त्यासोबतच इतर लैंगिक संबंधातून लागणारे रोग( **S.T.D. Sexually Transferred Diseses**) सुध्दा पसरतात काही भागात त्वचारोग तसेच काही भागात कुष्ठरोग याचेही प्रमाण आढळते. पूर्वी काही आदिम जमातीत 'याझ' नावाचा रोग होता हा कुष्ठरोग आणि लैंगिक रोग या दोन्हीचे एकत्रिकरणासर'या होता परंतु नियंत्रणात आणला गेला. याशिवाय ग'स्ट्रो, एनट्रायसिस, न्युमोनिया, लहान मुलामध्ये रिकटेस, पोटदुखी, पाठदुखी, मानेवरचे गंडमाळ, रातआंधळेपणा यासारखे रोगही विभागपरत्वे व जमातपरत्वे कमी–जास्त प्रमाणात आढळतात.

डॉ. राणी बंग यांनी गडचिरोलीतील स्त्रीरोगाचा जो अभ्यास केला. तो जगातला पहिला ठरला. या अभ्यासात त्यांच्या लक्षात आले की, 92 स्त्रियांमध्ये गर्भाशयात, योगीमार्गत रोग, जंतुदोष, सुज, मासिक पाळीच्या समस्या, पांढरा स्त्राव, कंबरदुखी, पाठदुखी इतरही रोग आढळतात. आदिवासी स्त्रियांमध्ये निरक्षरता मोठया प्रमाणात असल्यामुळे ते आपल्या आहारात विविध पोषक घटकांचा वापर करीत नाही. हे लोक आपल्या आहारात वनातून ज्या वस्तु प्राप्त होतात त्याचा उपयोग करतात. जसे की, रानआळू, हुलगे, भोकरे, वाघोटी इत्यादी पुरेशा आणि सकस आहाराच्या अभावामुळे आदिवासीमध्ये अशक्तपणा जाणवतो. अशक्तपणामुळे त्यांना वेगवेगळया आजाराशी सामना करावा लागतो. पर्यायाने भूकबळी आणि कुपोषणामुळे बळी जाणाऱ्यांची सं'या आदिवासी जमातीत अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, आहार आणि आरोग्य परस्परावलंबी आहेत. आहार उत्तम असला तर आरोग्य चांगले परंतु आहार पुरेसा नसेल तर अनेक आरोग्य विषयक समस्यांना समोर जावे लागते.

**गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातातील स्त्रियांचे आरोग्य व वनौषधी यांचा संबंध जाणून घेणे.**

आदिवासी हे स्वतला वनापासून आणि निसर्गापासून वेगळे समजत नाही निसर्गाचाच एक घटक म्हणून राहतात. आदिवासी लोकांची उपजिविका फळझाडावर रानभाज्यावर असते. तसेच त्यांचे आरोग्यही वनौषधीवर असते. झाडाझुडपावर त्यांचे दिर्घायुष्य अवलंबुन असल्याने अशा झाडाची ते तोड करीत नाही. पिंपळ, पायर, पळस, उबंट, वड, कविसा, सावर शीद (शमी) बेल इत्यादी वृक्षांना ते देववृक्ष म्हणतात. आदिवासामधील परंपरागत व अधंश्रध्देमुळे रोग किंवा आजार झाल्यावर ते प्रथम त्याच्या भगत पुजारीकडे जातात व भगत देव देवताना कौल लावून दैवकोप समजून त्यांच्या स'यानुसार धार्मिक व बळी देने इत्यादी करतात व पुजारी वनौषधी देतात. जसे की—

1) समजा एखाद्या मुलाला ताप आला झोपत नसेल पुरेसे जेवण करीत नसेल तर त्याला दृष्टि बाधा झाली असे म्हणून बिंबा, निंब, मिरच्या मीठ बाळावरून उतरवून रस्त्यावर टाकतात. यालाच दृष्ट काढणे असे म्हणतात.

2) बरेचदा पाठीत, अंगात चमक उठते तेव्हा हे लोक रानमावलीला ते नवस घेतात चमक बरी होताच ते मावलीला नारळ फोडतात किंवा यावर उपाय म्हणून पायाळू माणसाचा पाय पाठीवरून उतरवतात तर काही वेळा चामडयाची चप्पल उतरविली जाते.

3) एखाद्या स्त्रीला दुध कमी येत असेल तर त्यावर उपाय म्हणून उपलब्ध असलेली जडीबुट्टी, कंद खायला व प्यायला देतात अशी वनौषधे जाणकराकडून घेतली तरच त्यांची मात्रा लागू पडते अशी या लोकांची समजूत आहे.

4) ज्या व्यक्तीला फीट येते त्या व्यक्तीला गाढवीचे दुध दिल्यास तसेच पिकलेल्या केळीतून जिवंत ठेकूण दिल्यास फीट बरी होते.

5) विंचू चावल्यास त्या जागेवर साबण किंवा चिचोका घासून लावल्यास विंचू उतरतो. अनु वी व्यक्ती मंत्राच्या आधारे विष उतरवितो यावर यांचा विश्वास आहे.

6) स्त्रिला पगर लागल्यास तिला वनौषधी देतात ती खा'याने पिल्याने पगर बरा होतो. त्याचप्रमाणे पोटातून येणे, कावीळ, डोळयास फुल पडणे, कुत्रा चावणे अशावेळी अनु वी व्यक्तीकडून वनौषधी घेवून आवश्यक ते पथ्य पाळले तर ते आजार बरे होतात. अशी समजूत या लोकांची आहे. म्हणूनच या लोकांचे प्राणीपूजा व निसर्गपूजा, पारंपारिक, सांस्कृतिक जीवनाचे अंग आहेत. आदिवासीच्या समजूती त्याच्यात प्रचलित असलेल्या रूढी आणि परंपरेने चालत आलेले आचार यांचे स्वरूप पाहिले तर झाडे, पशुपक्षी, नद्या, तळी, डोंगर इत्यादी संबंधी त्यांच्या मनात वसलेल्या भावाचे दर्शन घडते. यामुळे देवनिर्मित वनातील वृक्षांना आपल्याकडून इजा पाहचू नये याची दक्षता घेतात.

**गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातीच्या आहारात विशेष अन्नपदार्थाचा वापर केल्या जात नाही.**

आदिवासी समाजाची आर्थिक परिस्थिती फार हलाखीची आहे. त्यांचे उत्पन्न फारच कमी आहे. त्यांना ज्या वस्तु पाहिजे ते निसर्गातुन व सभोवतालच्या वातावरणातून मिळविण्याच्या ते प्रयत्न करतात. कधी–कधी वनातून गोळया केलेल्या वस्तु बाजारातून विकून हव्या त्या वस्तु खरेदी करायच त्याचे अन्न म्हणजे कंदमुळे, फळे, भाकरी, शिकार असे आहेत. परंतु सरकारने आता शिकारीवर बंदी घातली आहे. तसेच जंगलातून जे अन्नपदार्थ मिळतात त्यांच्यावर सुध्दा मर्यादा आल्यामुळे त्यांना जो विशेष आहार पाहिजे त्यांना मिळत नाही. या महिलाचा पोषण मानाचा विचार केला तर अत्यंत कमी उष्कामाचा अन्नामुळे महिलाचा पोषण दर्जा घालावलेला दिसतो 15 ते 19 वयोगटातील निम्याहून अधिक विवाहित स्त्रियांना ॲनिमिया या रोगाने ग्रासले आहे. रोजच्या आहारातून ज्या पोषक घटकांची आवश्यकता असते ते पोषक घटक यांच्या आहारातून दिसत नाही. म्हणून गर्भावस्था व दुग्धसर्जन काळात या महिलांना अनेक समस्याला समोर जावे लागते.

**आदिवासी गोंड जमातीतील स्त्रियांचे आरोग्य आणि वनौषध यांचा संबंध दिसत नाही.**

आदिवासी जमातीचे लोक निसर्गाशी इतके एकरूप झालेले आहेत की, त्याच्याशिवाय जणू त्याचे अस्तित्वच सभंवत नाही. या लोकांचे दिर्घायुष्य पुर्णत वनौषधीवर अवलंबून असते. परंतु असे असले तरी दिवसेदिवस वनौषधी वनस्पती, झाडे आणि पशुपक्षी घटणाऱ्या समस्येमुळे आदिवासी लोकांचे जीवन धोक्यात आले आहे. या लोकाना एखादा आजार झाला की, ते डॉक्टरकडे न जाता भगताकडे जातात भगत त्यांना वनात उपलब्ध असलेली जडीबुट्टी, कंद खायला व प्यायला देतात. या लोकांचा दैनदिन वावर जंगलातच असतो. तेव्हा जंगलामध्ये वावरणारे प्राणी उदा. सर्प व विंचू दंश करतात. त्याचप्रमाणे दृष्टिबाधा अर्धेडोके दुखणे, उसण भरणे, कावीळ होणे, फीट येणे, काजंण्या, आंगपेड, स्त्रीला पगर, ॲनिमिया, दुध कमी येणे आदी व्याधीपासून मुक्त होण्यासाठी परंपरागत चालत आलेले उपाय आदिवासी जमातीमध्ये आजही प्रचलित आहे व आजही हे लोक भगतानी दिलेले वनौषध घेतात. या उपचाराने बरेचदा गुण येत नाही. वरील या सर्व कारणामुळे विविध साथीच्या रोगाचे प्रमाण इतर समाजाच्या तुलनेने आदिवासीमध्ये अधिक आहे.

दळणवळणाच्या साधनाचा अभाव, आरोग्य सुविधाचा अभाव शे.पन्नास कि. मी. अंतरावरील इस्पितळ तेथेही समाधानकारक वागणूक व उपचाराचा अभाव असलेला यामुळे आधीच अडाणी, देवभोळा असलेला आदिवासी व त्यावर असलेल्या रूढी परंपरेच्या पगंडयामुळे असहायतेमुळेच पूर्वपार चालत आलेल्या गताचा अंगारा आणि धुपारा वनौषधावर डॉक्टरपेक्षाही अधिक विश्वास ठेवतो, समजा भगताच्या अंगारा धुपारा याच्याने गुण आला नाही की मग उपचारासाठी डोली बांधून मैलाने मैल अंतर तुडवून दवाखान्यात नेले जाते. तोपर्यंत रोगी अर्धमेला झालेला दिसतो.

**माहितीचे विश्लेषण–**

गडचिरोली जिल्हयातील कोरची या तालुक्यातील आदिवासी गोंड जमातातील स्त्रियाचा आहार व आरोग्य याबाबत माहिती संकलित करताना असे दिसून आले की कोरची तालुका 15 ऑगस्ट 1992 मध्ये

कुरखेडा तालुक्यापासून विभाजन झालेल्या नक्षलग्रस्त संवेदनशील कोरची तालुक्यात 30 ग्रामपंचायती असून 2001 जनगणनेनुसार 40 हजार 736 तालुक्याची लोकसंख्या आहे. हा तालुका डोंगरावर व घनदाट जंगलाने व्यापलेला आहे. उद्दीष्टानुसार माहितीचे विश्लेषण करताना या लोकांची आर्थिक परिस्थिती म्हणजे केवळ दैनदिन गरजाची पुर्ती करणे हेच असते. यावरून त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात येते, चौधरी उध्दव (1990) यांनी आदिवासी आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करताना ते म्हणतात की, ''आदिवासी समाजाची आर्थिक परिस्थिती हलाखाची आहे. त्यांचे उत्पन्न फारच मर्यादित असते. त्यांना पाहिजे ते निसर्गातून व सभोवतालच्या वातावरणातून मिळविण्याचा प्रयत्न करतात.'' या लोकांचे सामाजिक जीवन इतर समाजापेक्षा वेगळे दिसून येते ही जमात दुर्गम व डोंगराळ भागात राहते. यांच्या जीवनात त्यांचे रीतीरिवाज, धर्मश्रध्दा व परंपरा यांचा प्रभाव जनमाणसावर इतका पराकोटीचा असतो की त्यांचे पालन अत्यंत काटेकोरपणाने करतात.

डॉ. शैलजा देवगांवकर म्हणतात, ''जादूमुळे दृष्ट आत्म्याचे साव किंवा प्रभाव नष्ट करता येतो. गावावरील अनिष्ट रोगराई टाळता येते. व्यक्तीची रोगापासून सुटका करण्यासाठीही जादूचा वापर होतो.'' याशिवाय पाऊस येणे, शेतातून उत्तम उपज होणे यासाठीही त्याचा वापर होतो. यात बळीला महत्त्व असून पशु–पक्षी याबरोबरच नरबळीचाही वापर होतो. डॉ. देवगांवकर यांनी आदिवासी जमातीमध्ये जादूविषयी असलेला दृष्टिकोन मांडला आहे. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी स्त्रियांचे आहार आणि आरोग्य याचे विश्लेषण करताना असे आढळले की, पुरेशा आणि सकस आहाराच्या अभावामुळेच अदिवासीमध्ये अशक्तपणा जाणवतो.

अशक्तपणामुळे वेगवेगळया आजाराशी सामना करावा लागतो. पुरेशा सकस आहाराच्या अभावामुळे जन्माला येणारे मुल अशक्त कुपोशितच जन्माला येत. याविषयी आपले मत मांडताना आदिवासी अभ्यासक श्री. गुलाबसिंग वसावे म्हणतात, '' जन्माला आलेल्या दर हजारापैकी शंभर, सव्वाशे जणांना आपण जन्माला आलो म्हणजे काय हे कळण्यापुर्वीच प्राण सोडावा लागतो. श्री. वसावे यांच्या या मतावरून आदिवासीचे आरोग्य आणि आहार यांची वस्तुस्थिती नजरेपुढे येते. या संशोधनातील गृहतीकाचे विश्लेषण करताना आदिवासीच्या आरोग्य विषयक समस्या या त्यांच्या आर्थिक परिस्थिती पुरेसा आणि सकस आहाराचा अभाव जंगलविषयक धोरण त्यांचे शोषण, अज्ञान, अंधश्रध्दा याच्याशी निगडीत आहे. राष्ट्रिय महिला आयोग (1996) नवी दिल्ली द्वारा प्रकाशित '' अनुसूचित जनजातीय महिलाओं के लिए स्वास्थ सुविधाओं का विकास अहवाल स्वरूप ग्रंथात'' आदिवासी महिलाच्या आरोग्य दक्षतेबाबत काही महत्त्वपूर्ण समस्याचे निराकारणाबाबत योगदान दिले आहे. आदिवासी लोक उपासमार, आरोग्याचे प्रश्न आणि शिक्षणाचा अभाव या समस्येने ग्रस्त आहे. प्रस्तुत अहवालात एक बाब निर्दशनास आली की 'आदिवासी महिलाचे आरोग्य सारखे नाही' यास दुर्गम भागातील वास्तव्य पारंपारिक जीवन प्रणाली आरोग्य विषयक जाणीव जागृतीचा अभाव या बाबी कारणीभूत आहेत.

निष्कर्ष / शिफारशी–

गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गोंड जमातातील स्त्रियांचा आहार व आरोग्य एक चिकित्सक अध्ययन (कोरची तालुक्याशी संबंधित) संबंधित निष्कर्ष व शिफारशी पुढीलप्रमाणे:

1) कोरची तालुका हा डोगराळ भागात व जंगलानी व्यापलेला आहे. पावसाळयात लहान–सहान नाले रूद्र रूप धारण करतात त्यांच्यावर पक्के पूल नसतात त्यामुळे या लोकांना शेजारच्या गावात किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राला जाणे शक्य नसते. कोणी आजारी असल्यास त्याला वैद्यकीय मदत मिळत नाही. यासाठी प्रत्येक आदिवासी गाव मुख्य रस्त्याला बारमाही खुल्या राहणाऱ्या रस्त्याने जोडल्यास विकास लवकर होऊ शकते वाहने आतपर्यंत जाऊ शकतील व लोकांना दवाखान्यात बाजारपेठात जवळच्या शहरात सहजतेने जाता येईल.

2) जंगल हा आदिवासी जीवनाचा अवि ाज्य घटक आहे सदोष वन धोरणाचा आदिवासीच्या जीवनावर विपरीत परीणाम झालेला दिसतो 'असुनि मालक घरचा चोर म्हणती त्याला' अशी शतकानुशतके वनरक्षक केलेल्या आदिवासीची परिस्थिती करण्यात आली आहे. ''वन अधिकारी कायदा 2006 संमत झाल्यावर आदिवासींना जंगलातले त्यांचे परंपरागत हक्क पुन्हा उपभोगता येतील आणि वनव्यवस्थापणात त्यांचा सहभाग वाढेल अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.

3) आदिवासी लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांचा देशातील मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारत सरकारने आदिवासी विकासासाठी एकीकरणाचे धोरण स्वीकारले आहे. संविधानामध्ये असे स्पष्ट नमुद केले आहे की, ''देशातील सर्व मागासलेल्या वर्गाच्या अन्याय आणि राज्य शोषणाविरूध्द संरक्षण देईल.'' संविधानाद्वारे आदिवासीना देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासकीय धोरण तयार केले.

4) आदिवासी स्त्रियांना अनेक आरोग्य विषयक समस्यांना समोर जावे लागते. या समस्या दुर करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रूग्णालये यांचा प्रामु'याने समावेश असतो. तसेच बालकाचे आरोग्य, पोषक आहार आणि बालवाडी स्तराचे शिक्षण तसेच गर्भवती स्त्रिया आणि दुध पाजणाऱ्या माता यांना सल्ला व औषधोपचार या सर्वाच्या दृष्टिने एकात्मिक बालविकास योजना महत्त्वाची ठरते.

5) नवसंजीवन योजनाआदिवासीच्यासाठीची एक बहुआयामी योजना असून तिच्यात आरोग्य, पोषाहार, अन्नधान्य आणि कर्ज पुरवठा या विविध गोष्टी एकत्रित केलेल्या आहेत. तिच्याद्वारा पेयजल, आरोग्य संरक्षणार्थ सेवा या गोष्टीही उपलब्ध करून देऊन त्यातून एक समग्र एकात्मिक व समन्वयपूर्ण अमंलबजावणी करण्याची संकल्पणा कार्यान्वित करण्यात आली.

6) आरोग्य सखी योजना (1997) या योजनेद्वारे आदिवासी जमातीच्या महिलांना जनन व बाल आरोग्य याविषयी प्रशिक्षण साहयता दिली आहे. अनुसूचित जमातीच्या महिलांमधील माता व अर्भक मृत्युचे प्रमाण कमी करणे हा योजनेच्या मुख्य उद्देश आहे.एकदरीत वरील सर्व योजना

आदिवासीसाठी असलेल्या विविध योजना या महिलांना सक्षम करण्यासाठी राबविल्या जात आहेत. परंतु तरीसुध्दा उपेक्षित व दुर्लक्षित महिलाच्या समस्या या समोर येत असताना दिसतात.

**सारांशः**

भारत हा विविध धर्म वंश भाषा आणि संस्कृतिचे माहेर घर आहे. येथील प्रत्येक गट आपले वेगळेपण जपण्याची सतत प्रयत्नशिल असते. आदिवासी समाजाच्या अश्या धडपडीमुळे त्यांच्या एकुण समाज जीवनात वैशिष्टयपूर्ण आढळते. आदिवासी हे स्वतला निर्सगापासून वेगळे मानत नाही. आपण निर्सगाचाच एक घटक आहोत असेच ते मानतात. निर्सगावरच त्यांचे जीवन अवलंबून असल्याने तोच पोशिदा व रक्षणकर्ता आहे. असा हा निर्सगमय मानव आजही जुन्या रूढी परंपरा प्रथा आचार विचार कल्पना उरापोटीशी कवटाळून आहे. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय असून आजही ते परंपरागत पध्दतीने शेती करतात. आजही नदी नाल्याचे पाणी पिण्यासाठी वापरतात. शेतात पिकणारे धान्य, जेवनात तेला तुपाचा अत्यल्प वापर जंगली भाजीपाला, शिकार, कंदमुळे, मासे यावर आपली गुजराण करतात. पर्यायाने सकस आहाराच्या अभावाने त्याना अनेक आरोग्य समस्येला सामोर जावे लागते. त्यामुळेच या जमातीत कुपोषणाची संख्या अधिक आढळते. या समस्या दुर करण्यासाठी व त्याच्या विकासासाठी शासनाकडून अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. त्याशिवाय आदिवासी महिला संदर्भात आतापर्यंत झालेली अध्ययने त्यांची उद्दिष्टे निष्कर्ष याविषयी संदर्भ साहित्यांचा यात आढावा घेतला आहे.

**संदर्भ ग्रथ सुची**

1) डॉ. गोविंद गोरे– आदिवासी कलाविश्व, श्री. उत्मराव शासकीय मध्यवर्ती मुद्राणालय मुंबई (1986)
2) डॉ. प्रदिप आगलावे– आदिवासी समाजाचे समाजशास्त्र श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर
3) संजय साळुके– गोंड
4) डॉ. गोविंद गोरे– सहयाद्रीतील वनौषधी व आदिवासीचे पारंपारिक उपचार
5) आदिवासी संस्कृतीचे वेगळेपण
6) गोंड विकिपिडीया website
7) आदिवासी विकिपिडीया – website
8) सार्वजनिक आरोग्याची आशा – www.loksatta.com